॥ श्री सद्गुरु प्रसन्न ॥

ज्ञानामृतं भोजनम् ।

# पाझर अमृताचा


नोंदणी क्रमांक : MAHMAR/2004/14372

◈ वर्ष ८ वे ◈ अंक ४ था ◈ माघ-फाल्गुन शके १९३३ ◈ २४ जाने. २०१२ ते २२ मार्च २०१२

**प्रकाशक व मुद्रक:**
**श्री प्रदीप कुलकर्णी**

**मालक :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर
{नोंदणी क्रमांक : E-17128 (M)}
संपर्क : ९८२०५४९४१५

**प्रकाशनस्थळ :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर,
डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २,
गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

**मुद्रणस्थळ :**
**सुदर्शन प्रिंटिंग प्रेस**
१०, वडाळा, उद्योग भवन, वडाळा, मुं - ३१.

संपादिका : **सौ. नीता कुलकर्णी**

संपादन सहाय्य : **सौ. प्रतिभा गोखले**
**सौ. शामला आपटे**


## अंतरंग


◆ **Good Behaviour**
- श्रीसस माधुरीनाथ ०३

◆ रुचि रुचि भोजन - ०६

◆ भक्तगाथा - ०७

◆ गोजिरवाणी -
सौ. नीता कुलकर्णी १२

◆ अहो ऐकलतं का? -
- सौ .प्राची कुलकर्णी १३

◆ उत्सव विशेष - १७

## *Good Behaviour* - श्रीसस माधुरीनाथ

# वैश्विक एकात्मतेकडे नेणारा एक मार्ग...✍ सदाचरण

**सद्गुरू** - माझ्या लाडक्या! परब्रह्माची चार प्रकारची स्वरूप लक्षणे आहेत १) अस्तित्व २) भासकत्व ३) आनंदत्व ४) स्थिरत्व

स्थिरत्व हे ज्ञान आणि अज्ञानाच्या पलिकडचे आहे म्हणून त्याला ज्ञप्तीमात्र म्हणतात. जे की परब्रह्मीचे खरे स्वरूप लक्षण आहे. **'तेच तू आहेस'**! बाकीची सर्व लक्षणे तुझ्या पूर्वीच्या चुकीच्या समजुतीमुळे काहीतरी होते त्या अनुषंगाने सापेक्ष आलेली आहेत.

**शिष्य** - हे कसे काय, महाराज?

**सद्गुरू** - तू खालील प्रमाणे जोड्यांचा तक्ता बनवू शकतोस.

| | |
|---|---|
| परब्रह्म | माया (अज्ञानभ्रम) |
| अस्तित्व | नास्तित्व |
| भासकत्व | निराभासकत्व |
| सुखरूप | दुःखरूप |
| द्रष्टा | दृश्य |
| साक्षी | घटना, प्रसंग |
| चैतन्य | जड |
| निर्गुण | सगुण |
| निराकार | साकार |
| व्यापक | व्याप्य |
| अनंत | सान्त |
| परिपूर्ण | अपूर्ण |

तू अशी अनेकांची यादी करू शकतोस. कारण परब्रह्मतत्त्व **'ते तू आहेस'** अनंतगुणांचे आहे. त्यामुळे मी स्थिर आहे, याचा अनुभव घेऊन खरोखरच ब्राह्मीस्थितीवर स्थिर हो.



**शिष्य** - महाराज, हे मी कसे करू शकतो? मला कळले नाही. जरी तुम्ही मी स्वतः परब्रह्मरूप असल्याचे सिद्ध केले, ईश्वरही स्वतः परब्रह्मरूप आहे, तरीही मला वाटते काहीतरी फरक असावाच. मग आपण बरोबरी कशी करू शकणार.

**सद्गुरू** - लक्षपूर्वक एके. **''ते तू आहेस!''** (तत्त्वमसि) हे काही माझे वाक्य नाही. हे सामवेदातील वाक्य आहे. येथे तुला भागत्याग लक्षणेचा वापर करावा लागतो. यासाठी श्रीरामगुरुनी लिहिलेल्या **पंचीकरण** पुस्तकातील संदर्भ पहा. येथे मी तुला एक उदाहरण सांगतो की ज्यामुळे तू कदाचित समजू शकशील.

सागरातील पाण्याच्या एका थेंबाचा विचार कर. परिमाणदृष्ट्या प्रचंड मोठा फरक आहे. पण गुणवत्तेनुसार ते अगदी एकच पाणी रूप आहेत. येथे थेंबाचे परिमाण आणि सागराचे परिमाण दुर्लक्षित केल्या गेले आहे आणि पाणीरूप असण्याचा त्यांचा दोहोतील समान गुणधर्म दोघांचा सारखेपणा दाखविण्यासाठी विचारात घेतला गेला आहे. दोहीतील देहादीकांकडे आपण दुर्लक्ष केले आहे आणि दोहोतील परब्रह्म वस्तू विचारात घेतली गेली आहे. तुला समजले का? मी एक उदाहरण घेऊन समजावितो.

पुण्यातील एका लग्न समारंभामध्ये अनुराधाने मुग्धा नावाच्या गुलाबी साडी नेसलेल्या, लांब सडक केसांच्या सुंदर मुलीला पाहिले. ती तिच्या अप्रतिम सुंदर डोळ्यांवर आणि सुहास्य मुद्रेमुळे प्रभावित झाली. तिने तिची स्वतःची मुग्धाशी ओळख करून घेतली आणि तिच्याशी खूप गप्पा मारल्या. समारंभानंतर अनुराधा मुंबईला आपल्या घरी परतली. तिला बऱ्याच काळपर्यंत मुग्धाची आठवण येत होती. नंतर अनुराधा विवाहीत होऊन मुंबईतच राहू लागली. एका संध्याकाळी अनुराधा आणि तिचा नवरा एका यात्रा कंपनीच्या स्त्री प्रतिनिधीकडे परदेश प्रवासासंबंधी माहिती विचारण्यासाठी गेले. तेथील कर्मचारी म्हणाले,''मॅडम, आता कुठल्याही क्षणी येतील व हवे असलेले सर्व करतील.'' दोघेही वाट पाहू लागली. थोड्याच वेळात अनुराधाने पाहिले, पंजाबी ड्रेस घातलेली, शोल्डर कट केशरचना असलेली युवती निळ्या मारुती एस्टीम कारमधून खाली उतरली. ऑफिसमधील प्रत्येकाला शुभेच्छा देत ती युवती ऑफिसात शिरली आणि तिच्या केबीनमध्ये गेली. अनुराधाला वाटले की तिने त्या युवतीला पूर्वी कधी तरी पाहिले आहे, परंतु आठवेना. हे दांपत्य केबिनमध्ये बोलावल्या गेले. ते केबिनमध्ये प्रवेश करतात न् करतात तोच ती युवती

उद्‌गारली, 'हॅलो! मी चुकत नसेन तर आपण अनुराधा आहात ना?''

अनुराधाला अजूनही ओळख पटली नव्हती. ती युवतीच पुढे म्हणाली,''मॅडम आपण काही फार बदलला नाहीत, परंतु आपण पुण्यात एका लग्नसंमारंभात भेटलो होतो.'' एकदम अनुराधाच्या लक्षात आले आणि ती म्हणाली,''आहा! ती तू आहेस?'' आता येथे 'ती' म्हणजे अनुराधाला पुण्यात भेटलेली गुलाबी साडीतील, लांबसडक केसांची मुलगी 'तू' म्हणजे यात्रा कंपनीच्या ऑफिसमधील पंजाबी ड्रेस घातलेली, शोल्डर कट केशरचनेतील युवती, 'आहेस' म्हणजे हसतमुख चेहऱ्याची, अप्रतिम डोळ्यांची स्त्री, जी तिला दोन्ही ठिकाणी भेटली होती. येथे अनुराधाने पोषाखपद्धती आणि केशरचना 'ती' आणि 'तू' या दोन्ही प्रतिमातील सोडून दिली आणि नंतर दोन्ही प्रतिमांचे तादात्म्य 'आहेस' या आतील एकमेव स्वाभाविक स्त्रीशी केले.

तुला उदाहरण समजले का?

**शिष्य** - होय, महाराज! मला समजले. अहाहा!...

आपले आभार मानू म्हटले आणि माझी अवस्था समजावू म्हटले तरी सुयोग्य शब्दच नाहीत. परंतु तरीही मी माझ्या डोळ्यांनी उघड उघड परब्रह्म पाहू शकलो. (चक्षुर्वैसत्यम्) आता मी मनुष्य जन्माला आल्यानंतर जे काही करायचे असते ते केले आहे. आता मला कोठेही जायचे नाही आणि परब्रह्मवस्तूचा शोध घेत फिरायचेही नाही. ते तर सगळीकडेच सहज प्राप्त आहे. आता मला असे वाटते की मी छान झोप काढावी .

**सद्‌गुरू** - अरेरे!... मूर्ख माणसा असे वाटते तू अजूनही धोकादायक मायाभ्रमातून बाहेरच आलेला नाहीस. आता जर झोपशील तर परत स्वप्न पाहू लागशील आणि पूर्वीसारखाच घाबरशील म्हणून सावध रहा.

**शिष्य** - महाराज, मग आता मी काय करावे? मला कृपया मार्गदर्शन करावे. मला वाटले की आता काहीच करावयाचे उरले नाही.

**सद्‌गुरू** - हा हा हा! मूर्खा, तुझा माझा जितका म्हणून संवाद झाला तितका सर्व खोटा. पण तू आणि मी एवढेच नव्हे तर संपूर्ण विश्व सुद्धा अगदी खरोखर चैतन्य नाही का झाले?

**शिष्य** - तुम्ही मला जगात अफाट पसरलेले माझे स्वतःचे परब्रह्मस्वरूप



दाखविल्यामुळे सर्वच गोष्टींचा विसर पडला. ईश्वरभक्ती संबंधीचा माझा प्रश्न पूर्णपणे सुटलेलाच नाही. आपण खरोखरच एक परिपूर्ण कैवल्यपुतळा आहात की जो माझ्यासारख्या जड जीवांना वळवून परत आपल्या चैतन्य परब्रह्म स्थितीवर आणतो. माझ्यासारख्या अज्ञानात घोरत झोपा काढणाऱ्या शिष्यांचे खरे सांगाती सखे आपणच आहात. मी जरी माझ्या कातडीचे जोडे करून आपणांस दिले तरी आपल्या उपकारांच्या परतफेडीसाठी पुरेसे नाहीत. आज मी असे म्हणून शकतो, **'होय, मी ईश्वराचा अवतार पाहिला आहे!' आणि मी जर चुकत नसेन तर इथून पुढे हा देह अशाप्रकारे वागेल की कोणीही आपल्याला आणि आपल्या शिकवणूकीला बोल लावू शकणार नाही. देह सदाचरणाने रहावा की ज्यामुळे सभोवतालच्या प्रत्येक व्यक्तीला आनंदात राहता येईल तर आणि तरच येथे जिवंत स्वर्ग उभा राहिल'**

## रुचि रुचि भोजन करो मोरे लाला...

- श्रीसस माधुरीनाथ

### थालीपीठ

गहू हे परब्रह्म अधिष्ठान। प्रपंच जात्यात दळण।
गुरुबोधाची घेऊन चाळण। द्वैताचा तो कोंडा काढण।।१।।
प्रपंचातले तिखट अनुभव। मी पणाचे मीठ त्याला।
तीळ हेचि सुक्ष्मदृष्टी। तेल स्निग्धांश घालण।।२।।
श्रवणी श्रवण पाणी घालुनी। कणीक तिंबली थालीपीठाला।
माया हाचि पोळपाट। अविद्या लाटणी जाण।।३।।
थालीपीठ लाटले माया अविद्या मंथनी।
गॅस पेटविला वैराग्याचा, चित्त तवा जाण।।४।।
थालिपीठ चांगले खमंग भाजले। तेल स्निग्धांश घालून।
भक्ती ही ताटली घेऊन। दत्तमुखे खाई माधुरी जाण।।५।।
बाई मी सुगरण सुगरण। खमंग खाते अन्न।।धृ.।।

# भक्तगाथा...✍

महाराजांस पुन्हां साष्टांग नमस्कार करुन दोघेही घरी परत गेले. बोवांस त्या रात्री मुळीच झोप आली नाही. रात्र संपून केंव्हा दिवस उजाडतो असे झाले.डोळ्या पुढे सतत श्री गुरुमुर्ति दिसत होती. महाराजांविषयी विश्वास बोवांचे मनात पहिल्या दिवशीच उत्पन्न झाला होता; तरी पण नाणे पारखून घ्यावे असें त्यास वाटले. दुसरे दिवशी प्रातःकाली लवकर उठून नित्य विधि उरकून बोवा श्री लक्ष्मण महाराजांकडे गेले. महाराजांनी आपले जवळील नारळ वगैरे पूजासाहित्य देऊन बोवास आपल्या सांप्रदायानुसार अनुग्रह दिला. हि गोष्ट शके १८१८ साली म्हणजे सन १८९६ला झाली. अनुग्रह दिल्यानंतर बोवास संपूर्ण आत्मबोध केला. उत्तम वैद्य रोग्यास उत्तम मात्रा देऊन ज्या प्रमाणे तात्काळ त्याच्या व्याधींचे निवारण करितो, त्या प्रमाणे आत्मबोधरुपी मात्रा महाराजांनी बोवास दिल्याबरोबर त्यांचे डोळे एकदम उघडले गेले व त्यास परमानंद झाला. त्या आनंदाच्या भरात **'गुरु महाराज गुरु। जय जय परब्रह्म सद्गुरु।।'**

या प्रमाणे ते भजन करु लागले वारंवार महाराजांच्या पायावर डोके ठेवून पुन्हां भजन करित करित ते नाचूं लागले.

- अभंग -

उचलोनी वेडा हृदयी अलिंगिला। प्रेमे कुरवाळिला करुणाकरें ।।
माझिये पाडसा बहु शीणलासी। म्हणोनी ओक्साबोक्सी स्फुंदतसे।।
मस्तकीं ठेवोनि हस्त, भ्रम दूर केला। वर तो वोपिला गुरुनाथे ।।
वेडा प्रेमानंदे नाचतों अंगणी। सद्गुरुचरणी ठेवी माथा।।

त्या वेळेस हा अभंग बोवांच्या मुखांतून सहज स्फुर्तीने निघाला व त्यांस श्री गुरुमहाराजांचे वेडच लागले.

बलभीम बोवांचे अंगी पूर्वीच पूर्ण विरक्ती व मुमुक्षुत्व होते, ते साधन चतुष्टय संपन्न होते, त्यामुळे कापुरास ज्याप्रमाणे अग्नि लागताच तो पेट घेतो व अग्निरुप होऊन स्वतः शिल्लक राहात नाही त्याचप्रमाणे ब्रह्मोपदेश होताच बोवा आपलेपणाने शिल्लक राहिले नाहीत. **''आता मी नाही मी नाहीं सद्गुरुवाचुंनि कांही नाही।। वैद्य भेटला गुरुदाता। रोगा पालट झाला आता।। रस ओतिला कानांत। जाऊनि झोंबला नयनात।।''** याप्रमाणे बोवांची स्थिति झाली. सद्गुरु वचनी दृढ विश्वास व सद्गुरुचरणी अनन्य शरणागती हे दोन गुण बोवांच्या अंगी असल्यामुळे त्यास प्रबोधन तत्काळ झाले. "आपणासारिखे करिती तात्काळ। नाही काळ वेळ तया लागी।'' हे खरे, पण केंव्हा? शिष्य अनन्य शरण असेल व प्रज्ञावंत असेल तेव्हां!

वरीलप्रमाणे शिष्याच्या अंगी गुण असतील तर ज्ञान तेव्हांच होईल, नाहीतर होणार नाही. अनुग्रह घेतल्यापासुन बोवांच्या वृत्तींत एकदम फरक पडला. त्याच्या डोक्यावरील सर्व ओझे नाहीसे झाले. आकाशातील खैर पक्षाप्रमाणे त्यांस स्वतंत्र वाटू लागले. जन्मजन्मांतरीचे पुण्य आज फळास आले असे त्यास वाटले. देहाभिमानाची शृंखला ताबडतोब गळुन पडल्यामुळे 'संपूर्ण जगदेव नंदनवन सर्वेपि कल्पदृमाः।' अशी स्थिति त्याच्या अनुभवास आली. आजपर्यंत कधीही अनुभवास न आलेल्या अक्षय सुखाचा सक्षात्कार त्यांस झाला. 'धन्य श्रीगुरुमाय। धन्य श्रीगुरुमाय।' असे उद्गार त्यांच्या मुखांतून निघाले व अंतःकरणात अष्ट सात्विकभाव दाटून आले . सर्वांग पुलकित होऊन त्यांच्या नयनातून अश्रुधारा वाहुं लागल्या व कंठ सद्गदित झाला.

**-अभंग -**

काय वानूं आता न पुरे ही वाणी। मस्तक चरणी ठेवीतसे।।
धन्य काळ संत भेटी। पायीं मिठीं पडलीसे।।
संदेहाची सुटली गाठी। झाले पोंटी शीतळ।।
भवनदीचा झाला तारा। ज्या उतारा प्रसादें।।
तुका म्हणे मंगल दाता। कोण दाता याहुनी।।१।।

या श्री तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणें बोवांची स्थिति झाली. याप्रमाणे अनुभव आल्यानंतर बोवांस महाराजांजवळून हालावेसे वाटेना. आपण केलेला आत्मबोध बोवांस उत्तम प्रकारे अनुभवास आला पाहून श्रीलक्ष्मण महाराज बोवांस विनोदाने म्हणाले, 'बोवां! आम्ही आपले इच्छीत कार्य केले व सदोदित करु, परंतु आपण काही गुरुदक्षिणा आणली आहे काय?' हा प्रश्न ऐकतांच बोवांस वाटले की, आतां आपण गुरुमहाराजांस गुरुदक्षिणा काय द्यावी? पत्नीच्या अंगावर जे होते नव्हते ते सर्व विकुन टाकले, आतां अगदीच कफल्लक झालो आहोत, जवळ काही पैसा नाही;

आतां गुरुमहाराजांस काय द्यावे? ही अडचण डोळयापुढे उभी राहिल्यावर बलभीम बोवांस अत्यंत वाईट वाटले. रडूं कोसळले, व महारांजाच्या पायावर लोटांगण घालून नम्रपणे म्हणाले की, 'मजजवळ काही नाही, मी आपणास काय देऊ?' नंतर महाराज बोवांस म्हणाले की, 'बोवा! तुम्ही सत्त्वशील आहां, घाबरण्याचे काही कारण नाही. माझ्या वचनाकडे तुम्ही सर्व लक्ष द्यावे. हीच लक्षदक्षणा तुमच्यापासून मला मागावयाची आहे, इतर नव्हे.' हे शब्द ऐकल्यावर बोवास धीर येऊन त्यांनी महाराजांच्या चरणी काया वाचा मन अर्पण करून नमस्कार केला व श्री गुरुचरणाचे अनन्य सेवक होऊन प्रेमलक्षणाभक्ति करणे याशिवाय दुसरे कर्तव्यच नाही, हे जाणून श्रीगुरुमाऊलीची रात्रंदिवस सेवा करावी असा निर्धार करून बोवा श्रीगुरुलक्ष्मण महाराज यांच्या सेवेत बराच काळ घालवू लागले.

श्रीगुरुंच्या रात्रंदिवस सान्निध्यामुळे बोवांच्या अंतरंगात फार फरक झाला. त्यांच्या अंगी लहानपणापासून असलेला नियमितपणा दृढ झाला. श्री लक्ष्मण महाराजांकडे त्यांचा रोजचा कार्यक्रम असा असे:- प्रातःकाली चार वाजता उठून शौचमुखमार्जनस्नानादि करून ते ध्यानधारणा करीत व पुढे श्रीगुरूंची सेवा, नंतर सकाळचे भजन, पुन्हा दुपारी महाराजांचे प्रवचन व रात्री भजन करणे, श्री गुरु निद्रिस्थ होईपर्यंत त्यांची चरणसेवा करणे व ते निजल्यावर मग आपण निजणे व ते उठण्याच्या अगोदर आपण उठून त्यांचे स्तवन व भजन प्रेमाने करणे हा रोजचा नियम असे. या शिवाय दर गुरुवारी, दर एकादशीस ज्यावेळेस श्री लक्ष्मण महाराज कीर्तनास उभे राहत त्यावेळेस त्यांच्या पाठीमागे ते साथ देत असत. अचूक व योग्य ती वचने व उक्त्या मधून मधून सुचवित, त्यामुळे महाराजांस त्यांची मदत चांगलीच होत होती. बोवास भजन कीर्तनाचा नाद लहानपणापासूनच असल्यामुळे त्यांना कीर्तन करण्याच्या प्रसंगी कधीही भीती वाटली नाही, व आता श्रीगुरुपदेशाने निःसंदेह ब्रह्मज्ञान झाल्यामुळे अंतरात दृढ विश्वास झाला. त्यामुळे ज्या वेळेस श्रीलक्ष्मण महाराज बोवांस कीर्तन करण्यास सांगत त्यावेळेस अधिकच रंग येई. कधी कधी महाराज बोवास कीर्तन करण्यास सांगून बोवांच्या पुढे स्वतः ऐकावयास बसत असत. प्रत्यक्ष श्री गुरुमाऊली कीर्तनात श्रवणास बसल्यावर बोवांस दुप्पट उत्साह वाटून त्यांच्या वाणीतून भक्तिरसाचा अविरत प्रवाह वाहत असे, त्यामुळे सर्व श्रोतृवृंदांस आनंदी आनंद होई. बोवा लहानपणीच नर्तन कलेत प्रवीण असल्यामुळे पूर्वरंग संपल्यावर



नामस्मरणांच्या गजरात श्रीगुरुमाऊली समोर ते प्रेमानंदे नाचत असत व अशा समयी श्री लक्ष्मण महाराजांस आपल्या शिष्याचे एकनिष्ठ प्रेम व तल्लीनता पाहून हृदय उचंबळून येई व त्या भरात कधी कधी ते आपल्या शिष्यास कथेतच गाढ आलिंगन देत असत. त्या वेळची ती गुरुशिष्याची भेट म्हणजे साक्षात् हरिहरांची भेट होत असे. गुरुमहाराजांसही आपल्या शिष्याची धन्यता वाटे. कीर्तनाचा वेळ केव्हाच निघून जाई. गुरु-शिष्यांची कीर्ति हळूहळू सर्व शहरात पसरली. त्या उभयतांच्या पैकी कोणाच्याही प्रवचनास अथवा कीर्तनास मंडळीची फारच गर्दी जमत असे. सर्व लोकांस गुरुशिष्यांची ही अपूर्व जोडी पाहून कौतुक वाटे व उभयतांविषयी सर्वांस फार आदर असल्यामुळे लोक त्यांचे कीर्तन अथवा प्रवचन मोठ्या प्रेमाने श्रवण करीत. या गुरुशिष्यांची जोडी पाहून इंदूर येथील रा. कृष्णाजी सीताराम हरसोलेकर (साधू) शिवप्रसाद भानुप्रसाद हायकोर्ट वकील, रामचंद्र यादव मिठे वगैरे बऱ्याच मंडळींची उभयतां गुरुशिष्यावर दृढ भावना बसली व ही मंडळी दोघांच्याही भजन, कीर्तन, पुराण वगैरे कार्यक्रमास नेहमी येत असत. एकादशीच्या रात्री लक्ष्मण महाराज व बोवा इतर मंडळीसह सबंध रात्रभर मोठ्या प्रेमाने हरिकीर्तन व भजन करीत असत, त्यामुळे सर्व मंडळी आनंदित होत. इंदूरचे कै. श्रीमंत श्री शिवाजी महाराज होळकर हे स्वभावाने फार कडक असत, व सर्व लोकांस त्यांची फार भिती वाटत असे. परंतु श्रीलक्ष्मण महाराजांवर त्यांचे फार प्रेम असे व त्यांजविषयी त्यांना फार आदर वाटे. श्री. लक्ष्मण महाराज आपल्या भजनी मंडळीसह रात्र रात्र भजन करीत असत. परंतु त्यांच्या त्या कार्यक्रमास त्यांनी कधीच अडथळा केला नाही, उलट ते स्वतः श्री. लक्ष्मण महाराजांचे कीर्तन अथवा भजन ऐकण्यास कधी कधी येत असत.

गुरुमहाराज व बोवा एकाठिकाणी निचिंत बसले असता त्यांची पारमार्थिक चर्चा फार बहारीची व महत्त्वाची होत असे. अशा पारमार्थिक चर्चेमुळे बोवांच्या ज्ञानात फार भर पडे व इतर श्रोत्यासही पुष्कळ फायदा होत असे. कित्येकदा बोलता बोलता त्यांचे तासचे तास निघून जात, तहान भूक वगैरे कशाचीही शुद्ध त्यास राहत नसे. एके दिवशी बोवांनी 'ज्ञानयज्ञ' या विषयावर एक पद्य केले व ते श्रीगुरुस म्हणून दाखविले ते ऐकल्यावर महाराजांस अत्यंत आनंद झाला व या पद्यावर एक कथा करावयास सांगितली. दुसरे दिवशी ते पद्य घेऊन त्यावर निरूपण केले. विवरण इतके उत्तम झाले की, सर्व श्रोतृजनास अत्यंत आनंद झाला. बोवांची चतुराई प्रेमळपणा व

समजून सांगण्याची पद्धत पाहून गुरु महाराजांस फारच समाधान वाटले. शिष्याचे उत्तम गुण पाहून कोणाच्या गुरुला आनंद होणार नाही? ''देखा बालकाच्या घणी घाइजे। का शिष्याचेनी झालेपणे होइजे। हे सदगुरुचि एकलेनि जाणिजे। का प्रसवतिया।।१।।'' या ज्ञानेश्वर महाराजांच्या उक्तीप्रमाणे श्री लक्ष्मण महाराजांस बोवांची स्थिती पाहून धन्यता वाटे. बोवांनी केलेले ज्ञानयज्ञाचे पद्य याप्रमाणे आहे.

**पद**

**ज्ञानयज्ञ**

सच्चिदानंद मूर्ति गुरुची। दाखविली मज वाट तयाने ज्ञानयज्ञाची।।धृ.।।
दाखविला ज्ञानयज्ञ मोठा। लक्षचौऱ्यांशी जन्ममरणा दिधलासे फाटा।।
सांगतो यज्ञाची खूण। एकाग्र होऊनी सावध ऐका मुमुक्षूजन।।
पाऊंले स्मरोनि श्रीगुरुची। दाखविली मज वाट तयाने ज्ञानयज्ञाची।।१।।
स्फूरणरूप माया पूर्व अरणी। नामरूपात्मक दुजी अविद्या उत्तर ही अरणी।
दाविल्या अरण्या या दोन्ही। दोहीचे अनुसंधान हाचि मंथा ते स्थानी।।
सांगतो खूण मंथनाची। दाखविली मज वाट तयाने ज्ञानयज्ञाची।।२।।
नामरूप उद्भवतां क्षणी। तये काळी आठव व्हावा 'ब्रह्मास्मि' म्हणूनी।।
नामरूप दृश्य जाणोनी। अस्ति भाति प्रिय व्हावे नंतर त्यागावे दोन्ही।।
ऐशी स्थिति हो मंथनाची। दाखविली मज वाट तयानें ज्ञानयज्ञाची।।३।।
निशिदिनी मंथन हे करितां। तयेकाळी वरिल तुम्हा दृढ अपरोक्षता।।
दृढ अपरोक्षाची खूण। कालत्रयिंही नामरूपाचे नोहे उद्भवन।।
दृश्य मग दिसो परी साची। दाखविली मज वाट तयाने ज्ञानयज्ञाची।।४।।
या नावे निःसंशय ज्ञान। हाचि अग्नि धडाडिला मग चुंबितसे गगन।।
पिंड ब्रह्मांड अष्टदिशा साधोनी। ऐशा कुंडे पेटविला हा ब्रह्मज्ञानाग्नि।।
आहुती नामरुपाची। दाखविली मज वाट तयाने ज्ञानयज्ञाची।।५।।
नामरूपें जळाली सारी। द्रव्यचि सरलें, भस्महि नुरलें तेव्हा निर्धारी।।
केवल लयसाक्षी अद्वय। अवशिष्ट उरलें तेची पुरोडांश होय।।
रीत ही ऐसी यज्ञाची। दाखविली मज वाट तयांने ज्ञानयज्ञाची।।६।।
विज्ञानमय पुरोडांश। परब्रह्म ते निजअंगे हो आले निःशेष।।
लक्ष्मण थापटी माथा। वेड्या अंगी प्रगटलि ज्ञानयज्ञाची वार्ता।।
त्यावरी कृपाहो सद्गुरुची। दाखविली मज वाट तयाने ज्ञानयज्ञाची।।७।।



# गोजिरवाणी...

**- सौ. नीता कुलकर्णी**

**आजी-** मी आज तुम्हाला स्वामी विवेकानंदाची गोष्ट सांगणार आहे.

**मुले-** सांग ना आजी!

**आजी-** अरे एकदा स्वामी अमेरिकेला गेले होते. तेव्हा नदीच्या तीरावर काही तरुण मुले त्यांना दिसली. ती मुले पाण्यावर असलेली अंड्याची टरफले बंदुकीचा नेम धरून उडवत होती.

**मुले** - मग त्यात काय झाले?

**आजी** - अरे, ती टरफले पाण्याच्या लाटांवर वर-खाली होत होती. त्यामुळे त्यांचा नेम सारखा चुकत होता. ते पाहून स्वामीजींना हसू आले.

**मुले-** हो आजी?

**आजी-** अरे, हो त्यामुळे मात्र त्यातील एकजण रागावला व स्वामीजींना म्हणाला,'एवढेच आहे तर दाखवा ना नेम धरून!'

**मुले** - मग आजी?

**आजी** - स्वामीजींनी बंदुक हातात धरली व एकानंतर एक बारा हलती टरफले उडवली!

**मुले** - बापरे! मग?

**आजी** - अरे, मग काय, त्यांना वाटले स्वामीजी सराईत नेमबाज आहेत. त्यांनी तसे त्यांना विचारलेही! त्यावर स्वामीजी म्हणाले,''मी तर आज पहिल्यांदाच बंदुक हातात धरली.'' स्वामीजींनी त्यांना एकाग्रतेमुळे हे साध्य झाल्याचे सांगितले.

**मुले** - हो आजी?

**आजी-** हो! बर कां मुलांनो, तुम्हीही अशी एकाग्रता अभ्यासात ठेवली पाहिजे, त्यामुळे तुम्हाला तुमचे ध्येय पूर्ण करता येईल.

# अहो ऐकलतं का?...

सौ. प्राची कुलकर्णी

## जाऊ देवाचिया गावा...

**निर्मला :** अहो ललिताबाई ऐकलंत का?

**ललिता :** इश्शं गं बाई! अहो बिहो काय म्हणतेस गं मला? परकी का झाले मी तुला?

**निर्मला :** तसं नाही गं! तुझं दर्शन दुर्मिळ झालंय ना!

**ललिता :** अगं उत्सव येतोय ना जवळ म्हणून थोडी जमवाजमवी चालली होती.

**निर्मला :** रोज रोज कसला गं उत्सव करता? माझी नणंद त्यादिवशी चौकशी करीत होती.

**रेवा :** प्रत्येक उत्सवात एकच तर सांगतात ब्रह्म अन् माया!

**ललिता :** वर्षभर असतात ते सर्वांसाठी उत्सव! पण नृसिंह जयंती मात्र खास बालकांसाठी! वर्षभर अभ्यासाच्या ओझ्याखाली दडपून गेलेली मुलं या उत्सवात कशी बहरलेली दिसतात.

**माधवी :** तुझं आपलं काहीतरीच! परीक्षेचा निकाल पाहिला की कळतं वर्षभर नुसती हुंदडत असतात.

**ललिता :** हो नं! सर्व पालकांना असेच वाटते. 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा ज्याचा त्रैलोक्यी झेंडा! आणि 'कन्या व्हावी ऐशी गुणखाणी, जीये लागी पंचकन्या स्मरणी' नाही का?

**माधवी :** वाटतचं ना! पण हे घडावं कसं?

**ललिता :** हेच घडवण्याचं काम या उत्सवात होतं!

**मंजिरी :** पण ललिता मावशी, या उत्सवात तर मोठी माणसेसुद्धा असतात ना?

**ललिता :** अगं हो! हीच तर या उत्सवाची खासीयत आहे. प्रत्येक प्रौढामध्ये सुद्धा लहान मूलं दडलेलं असतचं की! त्यामुळेच या उत्सवाचे वयानुरूप चार गट (बाल, कुमार, तरुण, प्रौढ) पाडले जातात आणि प्रत्येक गटातून प्रल्हाद निवडला जातो.

**निर्मला :** पण प्रल्हादाची गोष्ट तर वेगळीच आहे ना!

**ललिता :** अगं हो! गर्भात असल्यापासून बाळावर संस्कार घडत असतात. त्यासाठी आईवडिलांनी सजग रहायला हवे. आईवडिलांच्या मिलनातून बीज अंकुरत



असते. ही वेळ साधताना दोघांच्याही चित्तवृत्ती प्रसन्न असतील तर येणार बाळही प्रसन्न, हसतमुख असेच असते. ही गोष्ट प्रल्हादची आई कयाधु हीने साधली आणि राक्षसवृत्ती डावलून सत्त्वगुणांकीत प्रल्हादाचा जन्म झाला.

**रेवा :** खरचं की काय? हे तर मला ठाऊकच नव्हते.

**ललिता :** प्रल्हादाच्या कथेतून कळतात या गोष्टी! अशा गर्भवती स्त्रीची अभिलाषा धरून तिचे अपहरण करणाऱ्या इंद्राला नारदमुनी अडवतात. कडक शब्दात कानउघडणी करतात. तेव्हा शरमेने कयाधुला वाटेतच सोडू पहाणाऱ्या इंद्राला सुयोग्य मार्ग दाखविण्याचे कामही नारदमुनीच करतात.

**निर्मला :** म्हणजे काय करायला सांगतात? त्याला कोणते प्रायश्चित्त देतात?

**ललिता :** अगं, पती घरात नसताना स्त्रीचे अपहरण करणे व अपहरणानंतर मध्येच सोडणे या दोन्ही गोष्टी दोषार्ह आहेत. मग त्या दुर्जनाच्या हातून घडोत वा सज्जनांच्या! संत स्पष्टवक्ते असतात. गर्भवती स्त्रीचा पती परत येईपर्यंत तिची काळजी घेण्याचे प्रायश्चित्त त्याला देण्यात आले.

**माधवी :** आता आली का पंचाईत? काय केलं गं त्याने?

**ललिता :** तो काय करणार कप्पाळ! मला हे करता येणार नाही म्हणून पाय धरले नारदमुनींचे! शेवटी नारदमुनींनी सांगितले की तिला आश्रमात ठेवावे. म्हणजे आश्रमवासी तिची काळजी वाहतील.

**रेवा :** मग काय रात्रंदिवस 'नारायण नारायण' असे कानावर पडत असेल नाही का?

**ललिता :** होय ना! आश्रमातील शांत, सात्त्विक प्रसन्न वातावरणात कयाधु रमून गेली.

**निर्मला :** ठीक आहे गं! इंद्र, कयाधु, प्रल्हाद, नारदमुनी या सगळ्या पुराणातल्या गोष्टी! त्याचा आताच्या युगाशी काय संबंध?

**माधवी :** आता मात्र पिडीतेच्या पदरी निराशाच येते. इंद्रासारख्या सुष्ट म्हणून सज्जनेतेचा बुरखा पांघरून समाजात उजळ माथ्याने वावरणाऱ्या दुष्ट प्रवृत्तींना समज देऊन अमुक एका स्त्रीचं हीत साधून देणारा अमुक तमूक नारद काही ऐकू आला नाही किंवा कळलाही नाही!

**ललिता :** असे सज्जन असतात गं! फक्त ते राजकिय पुढाऱ्यांसारखे किंवा व्यापारी कंपन्यांप्रमाणे जाहीरात लावून बसलेले नसतात. असे सज्जन आहेत म्हणूनच हे जग धडपणाने चालू आहे. एखाद्या स्त्रीच्या वाट्याला अशा प्रकारे दुष्ट, दुर्जन हिरण्यकश्यपूसारखा साथीदार आलाही तरी त्याच्याही पोटी प्रल्हादाचा जन्म कसा होतो हे ऐकावं ते गुरुमुखानेचं!

**मंजिरी :** खरचं मावशी काय मज्जा येते ना या गोष्टी ऐकताना उत्सवात!

**ललिता :** खरचं येते! एका नृसिंह जयंतीच्या निमित्ताने गर्भसंस्कार, बालसंस्कार, नामस्मरण भक्तीचे महात्म्य यासारखे सामाजिक व पारमार्थिक विषय गुरुमाऊली लीलया संभाळत असते. आता हेच पहा ना! या उत्सवात सर्वांना व्यायामाचे महत्त्व पटवून त्यांच्याकडून व्यायाम, खेळ करवून घेतले जातात, म्हणजेच आपल्या शरीराचे आरोग्य कसे टिकवावे यावर भर दिला जातो.

**निर्मला :** पण मनाचे काय गं?

**ललिता :** अगं त्यासाठीच तर हा उत्सव असतो. आणखी एक गमंत माहीती आहे का तुला मंजिरी?

**मंजिरी :** ती कोणती?

**ललिता :** अगं बाहेर जी शिबिरे होतात ना तिथे फक्त मुलांनाच प्रवेश असतो. पण आपल्याकडे मात्र मुलांबरोबर पालकही या उत्सवाची मजा लुटतात, ते पण मूल बनून!

**मंजिरी :** अय्या खरचं की!

**ललिता :** आणि गुरुदेव मोठ्या माणसांचे चुकीचे संस्कार आधी पुसतात, आणि मग सर्वांनाच सुसंस्कारीत करतात. सर्वांनाच स्वावलंबनाचे धडेही इथे दिले जातात. तसेच प्रत्येकच उत्सवात एखादी नाविन्यपूर्ण कल्पना राबवली जाते. सर्वांना परिसंवादात भाग घ्यायला मिळतो, सभाधीटपणाचे बाळकडू दिले जाते. तसेच सर्वांना समुहाने राहण्याचे प्रशिक्षणही मिळते.

**मंजिरी :** आणि रात्रीची नाटके व इतर करमणूक?

**ललिता :** खरचं! ते राहिलेच! मुलांनी स्वतःच लिहिलेली, दिग्दर्शीत केलेली, तसेच अभिनय केलेली नाटके, नाट्यछटा पहायला मिळतात. स्वतंत्रपणे करायला



मिळाल्यावर मुले काय काय करू शकतात ह्याचे प्रत्यंतर येते. खरं तरं हिऱ्याला पैलू पाडण्याचे कार्यच होते या उत्सवात!

आपण मात्र सरकारने असे करावे, समाजाने तसे करावे, समाजसेवकांनी असे करावे वगैरे वगैरे 'परोपदेशे पांडित्यम्' करणारे फुकट फौजदार! पण कठिण प्रसंग आल्यावर पळ न काढता प्रसंगांना तोंड कसे द्यावे हे शिकवणारी गुरुमाऊली! एखाद्याकडून चुकून काही अपराध घडत असला तर कोल्हे कुई करणारे आपण! आणि परिस्थितीवर शांतपणे विचार करून परिस्थितीवर तोडगा काढणारे गुरुमाऊलीसारखे संत सज्जन! नारद वगैरे कुठे गं शोधायला जायचं? चालू काळात तंबोरे घेऊन फिरणारे नारद का कुठे दिसणार आहेत? एका अर्थाने गुरुमाऊलीच नाही का नारद?

**निर्मला :** खरचं की काय? असं जर समजावून सांगत असतील तर जगाला नाव ठेवणारी माझी नणंदही येऊ शकेल ऐकायला!

**ललिता :** मग घेऊन ये तिला! या ३० एप्रिलपासून ४ मेपर्यंत आहे नृसिंहजयंतीचा उत्सव!

**निर्मला :** हो! पण यावेळी आमचा कार्यक्रम आधीच ठरला आहे. पुढच्यावर्षी नक्की येईनं हं! आता चलते बाई! फारच उशीर झाला, सायली यायच्या आधी घरी पोचायला हवं!

---


आपण काय करू शकतो?

**रक्तदान हेच जीवनदान!**

आपण एकाचे प्राण वाचवू शकतो!

## रक्तदान शिबिर

**श्री. सद्गुरु समर्थ दत्तात्रय गुरुज्ञान मंदिर, गोराई तर्फे**

**गुरुपौर्णिमेनिमित्त** रविवार दिनांक १ जुलै, २०१२ सकाळी ८.३० ते १२.३०

**स्थळ :** सुविद्या प्रसारक संघाचे मनोहर हरिराम चोगले विद्यालय,
गोराई, बोरीवली (प.), मुंबई - ४०० ०९२.

**संपर्क : श्री. प्रशांत शिवरकर - ९८७०१५२७६८**

**श्री. अतुल पोटघन - ९६१९९१९६४९**

**यावर्षी अधिक महिना येत आहे. अधिकाचे दान आधीच द्या!**
**रक्तदान शिबिराचा फायदा घ्या!**

# उत्सव विशेष...

## श्रीगणेश जयंती उत्सव

**माघ शु. प्रतिपदा ते माघ शु. चतुर्थी २४ जानेवारी ते २६ जानेवारी २०१२**

*तुम्ही कृपा केलीयावरी । पात्र होईन निर्धारी ।।१।।*
*आता नका करू दुजे। मी तू पणाचे उतरा ओझे।।२।।*
*एका जनार्दनी शरण। जीवींची निजखूण त्या दावी।।३।।*

## महाशिवरात्र उत्सव

**माघ कृ. द्वादशी ते माघ कृ. चतुर्दशी १८ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०१२**

*आपुलीया पदी प्रेम देऊनी। हरीसी भवसंकट।।१।।*
*स्वरूप संबंधी देसी समाधी। नित्य सुखामृत घोट।।२।।*
*सोहिरा म्हणे जहींची विकृती। झाली मनासी तहीं भेट।।३।।*
*करणी तुझी अलगट।।धृ।।*

## श्रीसस भागिरथीनाथ पुण्यस्थिती उत्सव

**फाल्गुन शुद्ध एकादशी ते फाल्गुन वद्य पंचमी ४ मार्च ते १२ मार्च २०१२**

*धन्य ज्ञानी, धन्य ज्ञानी, धन्य ते हरीभक्त योगी।*
*देही असोनी, विदेही झाले, त्यासी नाही, त्रिगुण भागी ।।धृ.।।*
*जन वन विजन, हरिरूप आपण, जाणोनि राहिले पाही।*
*पहाता पाहणे, ग्रासुनिया देख, निवाले आपुलीया ठायी।।१।।*
*स्वानंदाचे सुख, सर्वदा सेविती, क्रिडती आनंद डोही।*
*यापरी अनुभवी, अनुभवे लाधले, भवबंध त्यालागी नाही।।२।।*
*निजबोधे परिपूर्णत्वे संचले अखंड दंडायमान।*
*उदो अस्तु दोन्ही गिळूनी राहिले, नेणती भेदाचे भान।।३।।*

**पान नं. २ वर**



◈ वर्ष ९ वे ◈ अंक १ ला ◈ चैत्र-वैशाख शके १९३४ ◈२३ मार्च २०१२ ते २० मे २०१२

## अंतरंग


◆ **Good Behaviour** - श्रीसस माधुरीनाथ १८
◆ **रुचि रुचि भोजन** - २०
◆ **भक्तगाथा** - २१
◆ **गोजिरवाणी** - सौ. नीता कुलकर्णी २३
◆ **शब्द तेचि छेडीता** - मुधरा २४
◆ **तरुणाई** - आरती ढोरमले २६
◆ **गुंजारव** - श्रीसस माधुरीनाथ २७
◆ **उत्सव विशेष** - १७


## *Good Behaviour*

**- श्रीसस माधुरीनाथ**

## वैश्विक एकात्मतेकडे नेणारा एक मार्ग...✍ सदाचरण

**शिष्य** - महाराज! आणखी एक प्रश्न कदाचित शेवटचा! माझ्या समजुतीप्रमाणे काहीही कलाकुशलता जवळ नसलेला मी एक सर्वसामान्य माणूस आहे. जे गाऊ शकतात ते भजन, स्तोत्रे, महिमा वगैरे गाऊ शकतात. जे चांगल्या प्रकारे वादविवाद करू शकतात ते दुसऱ्यांना समजावून देऊ शकतात आणि सद्‌गुरुदेवांची आपला ईश्वर म्हणून स्तुती करू शकतात. परंतु मी सर्वस्व वाहिलेला भक्त कसा बनू शकेन? आणि माझ्या विचाराप्रमाणे मी माझे घर सोडून दिले पाहिजे आणि माझ्या सेवा, शिष्यांच्या खऱ्या चैतन्य ईश्वर असलेल्या आपणाला अर्पण केल्या पाहिजेत. माझी यानंतरची भुमिका काय असली पाहिजे?

**सद्‌गुरु** - तुला घर सोडायचे आहे का? खरोखरच?

**शिष्य** - होय, महाराज! एकदा मला कळले कि, नातेवाईक काही माझे नाहीत. मग त्यांच्या बरोबर रहायचे कशाला? त्याऐवजी मी येथे वेदान्त आणि धर्मशास्त्र

श्रवण करीत आपणाजवळच राहू शकेन की ज्यामुळे मी माझी अनावश्यक गुंतागुंत मर्यादित राखू शकेन.

**सद्‌गुरु -** लक्षपूर्वक ऐक, माझ्या लाडक्या वत्सा! जर प्रत्येकजण असाच विचार करू लागला आणि आला आणि इथेच राहिला तर जगराहटी चालू कशी राहील? तू पूर्वी रहात होतास तसाच घरीच राहा. फक्त फरक एवढाच होईल की तू 'सदाचरणात' वर्णन केल्याप्रमाणे वागशील किंवा जेव्हा केव्हा येथे येशील तेव्हा तेव्हा वेदान्त आणि धर्म शास्त्र यातील प्रश्न विचारू शकतोस की ज्यामुळे उत्तर देणारा जो कोणी असेल तो आपल्या ईश्वराची सद्‌गुरुदेवांची स्तुतीच करेल. सहजच, स्वतः वाणीने स्तुती केल्याशिवायही तू त्यांची स्तुतीच करशील. ज्याप्रमाणे तुम्ही प्रत्येक आठवड्याच्या शेवटी किंवा प्रत्येक महिन्यांत किंवा प्रतिवर्षी एकदा तरी किंवा असेच बाहेर फिरायला जाता, तसेच तू सद्‌गुरुदेवांकडे वेळोवेळी नियमितपणे न चुकता आले पाहिजेस. तुझ्या स्वतःच्या घरी निजघरी जा. बाहेर भटकत फिरू नकोस. तुझ्या देहाला त्याच्या घरी राहू दे आणि विहित कार्य किंवा स्वेच्छा सेवा कार्य करू दे. त्याचा तुझ्यावर काहीही परीणाम होणार नाही! जा आणि आनंदात जगा आणि तुझ्या देहासभोवती राहणाऱ्या इतर देहांनाही आनंदात जगु द्या.

**शिष्य -** महाराज! मी आपला आभारी आहे.

**सद्‌गुरू -** चला आपण प्रार्थना करू या.

**सद्‌गुरू आणि शिष्य - आता या 'ब्रह्मयज्ञा'ला परमेश्वर शुभशिर्वाद देवो. या वाक्‌यज्ञातील पावन अग्नि दुर्जनांचे दुःस्वभाव जाळून टाको आणि त्यांनाही हर्षभरीत जीवनाचा हा पवित्र मार्ग सापडो. विश्वात सर्वजण परस्परांशी मैत्रिपूर्ण वागोत. अज्ञानी जीवांचा उद्धार होवो. सर्व जण सदाचरणातून जिवंत नंदनवनाचा (स्वर्गाचा) आनंद घेवोत. कोणालाही त्यांच्या आयुष्यात दुःख भोगायला लागू नये. आत्मज्ञान प्रकाशाचा किरण सर्व जगाला उजळून टाकू दे. प्रत्येकाला भवसागरातून बाहेर काढणारा एकतरी सद्‌गुरु भेटू दे. सद्‌गुरुंच्या पारमार्थिक वक्तव्यातून ज्ञानामृताचा सतत ओघ वाहू दे.**

**सर्वः तथास्तु! (तसेच होवो, तसेच होवो)**

समाप्त



## रूचि रुचि भोजन करो मोरे लाला...

- श्रीसस माधुरीनाथ

**कलाकंद**

दहा इंद्रिये, पाच अंतःकरणे हि पंधरा जाणती साची।
प्राण अर्धाची जाणिला, स्वतंत्र जाणिव नाही त्याला।
साडे पंधरा रूपये जमविले, नरदेह गोकुळ दूध आणिले।
ज्ञानाग्नीची आंच दिली नाही त्याला।
मग नासण्याची चिन्हे दिसू लागली।
अगदिच वाया जायला नको। सारासार विचार थोडा केला।
सद्‌गुरुसी शरण जाता, दत्तगुरुसी शरण जाता।
ज्ञानाग्नीची आंच मंदाग्नी लाविली।
अज्ञानाचे पाणी आटविले। प्रेमभक्तीची साखर घातली।
अखंड हरीस्मरण रंग भरला। भजनकीर्तन वेलदोडा त्याला।
ऐसा कलाकंद बनविला। दत्तमाऊली भरवी माधुरीला।।

## गुंजारव

**- श्रीसस माधुरीनाथ**

गुढी उभारा तोरण बांधा। ज्ञानसूर्याचे स्वागत करा।।१।।
अज्ञान काळ पर्व जुने संपले। ज्ञानाची ती सुगी होऊ द्या।।२।।
ज्ञानकाळामध्ये भांडणतंटा नको। निजप्रेमाने जग सारे भरू द्या।।३।।
दत्तप्रेमाने सबाह्यांतरी भरता। माधुरीदत्त सद्‌गुरु भजुया।।४।।

**काही अपरिहार्य कारणास्तव 'पाझर'चे दोन अंक एकत्रित छापत आहोत. कृपया वाचकांनी याची नोंद घ्यावी.**

## भक्तगाथा...✍

श्री बलभीम बोवांचा मुलगा 'दत्तात्रय' ६/७ वर्षाचा झाला. त्याचे उपनयन करण्याची योग्य वेळ प्राप्ती झाली आहे असे पाहून त्यांनी त्याचा व्रतबंध करण्याचा विचार केला परंतु त्याच्याजवळ एक फुटकी कवडी देखील नव्हती. हे कार्य कसे पार पाडावे याची त्यांस मोठी काळजी वाटू लागली, परंतु भक्ताचे मनोरथ पुरविणारा श्री पांडुरंग समर्थ असल्यामुळे त्यांने पत्रावळीवाल्यांचे कुटुंब श्रीमती राधाबाई यांच्या मनात त्या गोष्टी विषयी प्रेरणा केली. सौ. कृष्णाबाई व श्री बलभीमबोवा या उभयतांवर श्रीमती राधाबाईचे फार प्रेम होते. एके दिवशी बोवा मुलाच्या मुंजीसंबंधी विचार करीत सचिंत बसले होते. श्रीमती राधाबाई तेथे सहज आल्या व त्यांनी बोवास सचिंत पाहून विचारले की, 'बोवासाहेब! आज आपण असे उदासीन का दिसता? बोवांनी आपले मनात जे विचार चालू होते ते सर्व श्रीमती राधाबाईस निवेदन केले. दत्ताची मुंज करणे आहे. त्याबद्दल बोवा काळजीत आहेत असे कळताच राधबाई बोवांस म्हणाल्या,''बोवा! दत्ताच्या मुंजीची आपण बिलकुल काळजी करू नये. हे कार्य श्री पांडुरंगाच्या कृपेकरून मी शेवटास नेईन. आपण मुहूर्त वगैरे ठरवून कार्यास आरंभ करा, अनुमान व संकोच मनात अगदी आणू नका.'' हे वचन ऐकून बोवास राधाबाईची धन्यता वाटली व त्यांनी तिथिनिश्चय ठरविला. राधाबाईनी स्वतः खटपट करून श्रीमंत मासाहेब महाराज होळकर यांचेकडून काही मदत मिळविली व बोवांच्या चिरंजीवाची मुंज करून दिली.

सुमारे २/३ वर्षे गुरुसान्निध्य राहून त्यांची उत्तम प्रकारे सेवा केल्यावर श्रीगुरु लक्ष्मण महाराज बोवांवर अत्यंत प्रसन्न झाले व बोवांस देश पर्यटन अथवा तीर्थाटन करून जागोजागी हरिकथाद्वारे दीन जनांस उद्धरावे अशी आज्ञा दिली. श्रीगुरुंनी जरी याप्रमाणे आज्ञा दिली तरी बोवासाहेबास श्रीगुरुंचे चरण सोडून दुसरीकडे जाणे बरे वाटेना. प्रथम बोवांनी आपली इच्छा विनंतिपूर्वक श्रीगुरुंस सांगितली. पण लक्ष्मण महाराजांच्या मनात बोवांस जगदोध्दारासाठी देश पर्यटनास पाठवावे असे असल्यामुळे त्यांनी बोवांस सांगितले की, ''बोवा प्रथम धार येथे परभू आळीतील दत्तमंदिरात जावे, तेथे श्री गुरुंच्या पादुकांची पूजा करून पुराण करून कीर्तनादि प्रभू सेवा करावी



व महिना दिड महिना याप्रमाणे घालविल्यावर देशी जावयाचे असल्यास जावे. आता आपले कार्य सफल झाले, पण 'आपण तरेल नव्हे ते नवल। कुळ उध्दारील आणिकांचे।' हे संत वचन लक्षात असू द्यावे. आपण सन्मार्गावर असल्यास श्री गुरुं सर्व संकटे नाहीशी करून सुखी करतील, हा दृढ विश्वास असो द्यावा; हेच आपणांस सांगणे आहे.'' श्री गुरुंचे हे वचन ऐकल्यावर ''ठीक आहे जशी माऊलीची मर्जी असेल त्याप्रमाणे हा दास वागण्यास तयार आहे. माऊलीच्या इच्छेविरूद्ध काडीमात्र वर्तन होणार नाही. '' अशी श्रीगुरुचरणाजवळ प्रतिज्ञा करून, गुरुमाऊलींची आज्ञा म्हणूनच केवळ मोठ्या कष्टाने शके १८२१ साली इंदूरहून धारेस त्यांचे आगमन झाले.

धार येथील दत्तमंदिरात बोवा रहावयास आले. तेथील त्यांचा कार्यक्रम ठरल्याप्रमाणे नियमित सुरू झाला. सकाळ संध्याकाळ ते भजन पूजन करीत व दुपारी देवळातच पुराण सांगत असत. पुराण सांगण्याच्या वेळेस पोथीपुढे धान्य, फळे वगैरे काही ठेवीत परंतु तेवढ्यावर बायको, मुलगा व स्वतः तिघांचा निर्वाह होत नसे, उपासमार फारच होऊ लागली. शेवटी त्यांनी भिक्षा मागण्याचे ठरविले. 'ब्राह्मणांची मुख्य दीक्षा। मागितली पाहिजे भिक्षा। ॐभवति या पक्षा। रक्षिलें पाहिजे।।' या श्री रामदाससोक्ती प्रमाणे 'ॐ भवति भिक्षां देहिं' करून ते उदरनिर्वाह करू लागले व अतःपर भिक्षावृत्तीने राहावे असा निश्चय केला.

हा निश्चय बोवांनी आपल्या पत्नीस कळविताच त्यास अत्यंत वाईट वाटले. त्या म्हणाल्या,'आपण साड्याचे देशमुख आहोत, त्यामुळे भिक्षा मागणे चांगले नाही, लोक नावे ठेवतील इतकेही असून भिक्षा मागणेच असल्यास इतर ठिकाणी गेल्यावर मागणे, परंतु येथे धारेस मागू नये, कारण येथे माझ्या माहेरकडील एक बोवा आहेत, त्यांचेकडे भिक्षेस जाऊ नये. त्यांस ही गोष्ट समजल्यास मग आपली छीः थूः होण्यास वेळ लागणार नाही.' पत्नीचे हे भाषण ऐकल्यावर बोवा म्हणाले. 'मी जो निश्चय केला आहे तो ढळणार नाही. माझी वाटेल तशी फजिती झाली तरी हरकत नाही.' असे बोलून पहिले दिवशी झोळीकरीता आपले स्वतःचे एक धोतर फाडून चौपदरी तयार केली व 'मना सज्जना भक्तिपंथेचि जावें।।' हा श्लोक म्हणून भिक्षा मागण्यास सुरुवात केली व आपले पत्नीचे माहेरकडील संबंधी जे बोवा होते त्यांजकडे

**पान नं. २५ वर**

# गोजिरवाणी...✍

- सौ. नीता कुलकर्णी

**आजी-** मुलानों आताच नृसिंह जयंती झाली ना!
**मुले-** हो आजी! आम्हाला भक्त प्रल्हादाची गोष्ट खूप आवडते.
**चिंगी-** आजी, हिरण्यकश्यपू नावाचा एक राक्षस होता व त्याच्या पोटी प्रल्हादाचा जन्म होतो. पण तो विष्णुचा भक्त असतो.
**गोट्या-** हो! आणि हेच तर त्याच्या बाबांना अजिबात आवडत नसते. प्रल्हाद मात्र 'नारायणाचे' सारखे नामस्मरण करीत असे.
**चिंगी** - मग, त्याचे बाबा त्याला महाभयंकर शिक्षा देतात.
**आजी** - अरे, बापरे सांगा तरी कुठली शिक्षा?
**चिंगू** - ते अगं आजी, एक नाही तर अनेक शिक्षा देतात. तरीही तो जिवंत रहातो.
**गोट्या** - त्याचेच तर आश्चर्य वाटते व बुद्धीला पटत नाही या चमत्काराच्या गोष्टी!
**मुले** - अरे पण तुम्ही गोष्ट तर पूर्ण सांगा! मग बघू आपण काय काय कळत नाही ते!
**चिंगू** - त्याला काचेच्या पेटीत जिथे विषारी साप असतात तिथे सोडतात, त्याचा कडेलोट करतात, त्याला शस्त्राने वार करतात, मोठ्या समुद्रात सोडतात तसेच अग्नितही जाळण्याचा प्रयत्न करतात आणि अगदी उकळत्या तेलाच्या कढईतही टाकतात पण तरीही हा जिवंतच!
**गोट्या** - मग मात्र त्याच्या वडिलांना त्याच्यात काहीतरी भुताटकी असल्यासारखे वाटते व हा मात्र बाबांना विष्णुची महती सांगत असतो. शेवटी विष्णु नृसिंह अवतार धारण करून हिरण्यकश्यपूचा वध करतो.
**आजी** - तो कसा माहिती आहे ना!
**चिंगू** - हो ना शस्त्राने ना अस्त्राने, ना सकाळी ना रात्री, ना जमिनीवर ना आकाशात, ना घरात ना बाहेर, असा उंबरठ्यावर, तिन्ही सांजेला, मांडीवर घेऊन, नखाने त्याचे पोट फाडतो व त्याचा प्राण घेतो.
**गोट्या** - इथेच तर प्रॉब्लेम आहे. आजी या पुराणातल्या गोष्टींचा खरा अर्थ सांग ना! त्या झालेल्या शिक्षा म्हणजे खऱ्याच का?
**आजी** - अरे हो! हो! आपण किनई एकेक करून सगळे समजावून घेऊ! तुम्हास माहित आहे का हिरण्यकश्यपू आपल्या आतही असतो.

**पान नं. २७ वर**



# शब्द तेचि छेडिता...✍

- मधुरा

तिन्ही सांजा सखे मिळाल्या, देई वचन तुला
आजपासूनी जिवे अधिक तू माझ्या हृदयाला।।धृ.।।
कनकगोल हा मरीचिमाली जोडी जो सुयशा
चक्रवाल हे पवित्र ये जी शांत गंभीर निशा
त्रिलोक गामी मारूत, तैशा निर्मल दाहि दिशा
साक्षी ऐसे अमर करूनी हे तव कर करि धरिला।।१।।
नाद जसा वेणूत, रस जसा सुंदर कवनात
गंध जसा सुमनात, रस जसा बघ या द्राक्षात
पाणी जसे मोत्यात, मनोहर वर्ण सुवर्णात
हृदयी मी साठवी तुज जसा जीवित जो मजला।।२।।
स्वकरे तरुवर फुले उधळिती प्रीती अक्षता या
मंत्रपाठ हा झुळुझुळू गातो निर्झर या कार्या
मंगलाष्टके गाती पाखरे मंजुळ या समया
सहस्रकर दिनकर हा स्वकरे उधळी गुलालाला।।३।।

एका नृसिंह जयंती उत्सवाची सुरुवात बोधापासून झाली होती आणि तो उत्सव बोधापासून ते अगदी शेवटपर्यंत ॲटेंड केला. तो उत्सव अजूनही डोक्यातून जात नाही. त्या उत्सवाबद्दल पूर्वी लिहीलेले आहे. पण हे गाणे ऐकलं आणि त्या उत्सवाचा संदर्भ द्यावासा वाटला.

पहिल्या दिवशी बोध झाला आणि त्याच्या नंतर काय वाटलं रादर उत्सव संपेपर्यंत मनात नक्की काय काय येत गेलं ते हे गाणं ऐकल्यावर आठवलं. अगदी डोक्यात वीज चमकावी तसं लख्खपणे काहीतरी जाणवलं आणि वाटलं काहीतरी लिहावं या गाण्यावर!

बोधानंतर तीन देह निरसून जातात आणि आपल्याही नकळत आपण गुरुदेवांचे बोट धरून पुढची वाटचाल करायचं वचन देतो आणि हळूहळू जाणीव व्हायला लागते की त्यांच्या इतकं आपल्याला जवळचं आणि समजून घेणारं कोणीच नाही. रादर

आपला श्वासच गुरुदेव आहेत!

गुरुदेवांनी दिलेलं ज्ञान हे सूर्याइतकं, खरं तर त्याच्यापेक्षाही शतपटीने तेजस्वी असतं. ह्या सूर्याची किरणं ही पृथ्वी शोषून घेते आणि एखाद्या काजव्याप्रमाणे का होईना, चमकू लागते आणि प्रखर उन्हानंतर क्षितीजावर अलगद उमलणाऱ्या त्या शांत रात्रीप्रमाणे या पृथ्वीला देखील महाकारणाची शाल मिळते. रात्रीच्या मंद, शीतल। निर्मळ वाऱ्याप्रमाणे सारे अवयव निर्मळ आणि शांत होतात आणि तेच आपण दिलेल्या वचनाचे साक्षी असतात.

पुढे काय होतं हे खरं तर सांगायची गरज नाही. सांगण पण अवघड आहे. पण तरीही त्या भावनेपर्यंत पोहोचायचा एक प्रयत्न तरी करता येईल. बासरीच्या प्रत्येक सुरात कसा मंद मधुर नाद असतो, तसाच गुरुदेवांच्या नामाचा 'नाद' जणू श्वासागणिक चालू आहे असं वाटतं. कवितेतल्या प्रत्येक अक्षरात जसा आशय ठासून भरला आहे. तसचं साऱ्या आसमंतात तेच एक तत्त्व आहे असं जाणवतं. फळांमध्ये जशी गोडी किंवा पाणीच कसं मोत्याचं रूप घेतं, तसेच, तेच एक वेगवेगळ्या रूपाने समोर येऊन उभं राहतं, सोन्याचं जसं तेज, तसेच तेज अखंड जाणवत राहतं!

शिवरात्रीच्या उत्सवात शिव-पार्वतीचं लग्न बघायला आणि अनुभवायला मिळालं, हेच शिव-पार्वतीचं एकरूप होणं म्हणजे गुरु-शिष्याचं एकरूप होणं असं मला वाटतं. म्हणजे आपण गुरुदेवांना सगळ्या आसमंतात अनुभवत असतो आणि एक क्षण असा येतो की जेव्हा लक्षात येतं की आपणही 'ते' च आहोत. आता दुसरं तिसरं काही नाही फक्त ते आणि तेच आहे आणि तेच 'मी' आहे!

---

**पान नं. २२ वरून**

प्रथम गेले हे पाहून पत्नीस अत्यंत वाईट वाटून त्यांस रडू कोसळले व त्या फार दुःखी झाल्या परंतु त्यांचे सांत्वन बोवांनी समाधानाच्या उपदेशपर गोष्टी सांगून केले.

भिक्षा मागितल्यामुळे अंगी निस्पृहपणा, निःसंगता, विरक्ती येते.

'भिक्षा म्हणजे कामधेनू। सदाफळ नव्हे सामान्यू।
भिक्षेस करी जो अमन्यू। तो करंटा योगी।।
भिक्षा म्हणजे अमरवल्ली। जिकडे तिकडे लगडली।
अवकाळी फलदायीनी झाली। निर्लज्जासी।।

ही श्रीरामदासांची शिकवणूक ते पूर्ण जाणत होते. (क्रमशः)

**तरुणाई**

# मज कळो आला...

**- आरती ढोरमले**

गुरुदेव म्हणजे काय? असा प्रश्न बोध घेण्याअगोदर असतोच, पण बोध घेतल्यानंतर फक्त हेच कळतं की गुरुदेव म्हणजे कोणीतरी वेगळे आहेत!

फिर लगता है की पर है क्या गुरुदेव मतलब? वैसे ही आरती को भी लगा। लेकिन प्रॉब्लेम था की गुरुदेव से कैसे पूँछ सकते है की गुरुदेव मतलब एक्झॅटली क्या? तो लता मौसी से पुछाँ गुरुदेव मिन्स एक्झॅट्ली क्या? तो मौसी ने बोला की गरुदेव मतलब भगवान! उनके बैठने, उठने, चलने से हर चिज से हमे ज्ञान होता है। लेकिन सच कहूँ तो कुछ समझ नही आया क्योंकि भगवान क्या होता हैं यही पता नहीं था। सिर्फ होमवर्क नही करने पर, 'हे भगवान, मॅम न आए', या फिर कुछ चाहिए हो तो भगवान से माँगा जाता है इतनाही पता था। और दुसरी चीज की गुरुदेव के हर एक चीज से ज्ञान कैसे लेते हैं यह समज नही आया। पर गुरुदेव के आसपास रहने से मजा आता था। बहुत मुश्किल से मंदिर आने को मिलता था। इसलिए लगता था कि पुरा टाईम उनके साथ ही जाए। दिन ब दिन लगने लगा **इस दुनिया में सिर्फ गुरुदेव ही सबसे मस्त है।** लेकिन, फिर भी इतना कुछ समझ नही आता था कि है क्या। पर हर एक दिन के साथ प्यार, आदर डबल होता जाता रहा। फिर एक उत्सव में पद आया,**'निर्गुण रूप पहा म्हणती हेचि ध्यान धरा चित्ती।'**

तब समझ आया, समझ नही कह सकते, पता चला गुरुदेव क्या है! अनंत, अनादि, सर्वव्यापक, शुद्ध, पूर्ण, निर्गुण, निराकार सब कुछ! ये सब कहने के लिए भी जगह नही, सब कुछ हर जगह, हर जरे में जो है, वो गुरुदेव है। उसके एक महिना बाद उत्सव में एक पद था, **'तंतू प्रेमाचा, परब्रह्माचा सगूण भगवंताचा, मज कळो आला आजि साचा'** वो सुनने के बाद एकदम पागल जैसे होने लगा।

मतलब एकदम अलग! अलग सिर्फ अहाऽऽऽ अहाऽऽऽ से एक्स्प्रेस कर सकते है। एकदम ऐसे, जैसे एकदम प्रॉपर गाँव के बंदे को (जिस गाँव में लाईट भी नही है) मॉल मे ले जाने से कैसे होगा, एकदम वैसा ही था ये उत्सव!

आरती तो जब भी मंदिर जाना होता है पहले ये पद सुनती है, मिन्स फिर से अहाऽऽऽ वाले स्टेट में और बस फिर मजेही मजे! ऐसे होते है गुरुदेव!

## संपादकीय...✍

इकडे वैशाखी वणवा सुरू होतो, अंगाची लाही लाही व्हायला लागते पण मुलांना मात्र हा वैशाखही सुखद वाटतो. कारण उन्हाळ्याच्या सुट्ट्यांचे बेत सुरु होतात. त्यातील एक बेत मात्र दरवर्षीच पक्का असतो. तो म्हणजे श्रीनृसिंह जयंती उत्सव! धमाल, मजा, खेळ, कथा, नाटके अशा विविध गोष्टींची मजा लुटत लुटत माऊली चिऊ काऊ करीत ज्ञानाचे घास कसे भरविते ते कळतच नाही! परत जाताना मात्र मुले वर्षभराची एनर्जी घेऊन तर जातातच पण या उत्सवामधनूच नवनवीन कार्यकर्तेही तयार होताना दिसतात. त्यांची माऊलीकडून होणारी जडणघडण प्रत्यक्ष पहायला मिळते. ह्याचेच प्रतिबिंब या 'पाझर' मध्ये आलेले आहे. 'गुड बिहेविअर'ची सांगता या अंकात होते आहे. मराठीमधून 'गुड बिहेविअर' वाचनाचा आनंद वाचकांनी नक्कीच लुटला असेल!

'भक्तगाथे'त मात्र श्रीसस बलभीम महाराजांची बोधानंतरची वाटचाल सुरु झालीआहे. ही वाटचाल आपण सर्वांनाच पुढील लेखांमधून जवळून अनुभवता येईल.

---

**पान नं. १७ वरून**

*ब्रह्मा धरूनी मशकावरी देखता वस्तुसमान।*
*भिन्नाभिन्न भाव सांडूनि समूळ सर्वांसी वंदिती जाण।।४।।*
*ब्रह्म होऊनिया ब्रह्मी लीन होणे वृत्तीवीण उत्साह।*
*माझे तुझे हे नाठवेचि काही, राहिले भावाभाव।।५।।*
*मनाचे मूळ अमूळ झाले राहिला देहभाव।*
*गुरुकृपे केशवी यापरी अनुभवी भोगिती अनुभव।।६।।*



## उत्सव विशेष...✍

### श्रीनृसिंह जयंती उत्सव

**वैशाख शु. नवमी ते वैशाख कृ. प्रतिपदा ३० एप्रिल ते ६ मे २०१२**

*स्मरता नित्य हरी। मग ती माया काय करी ।।धृ।।*
*नामरूपात्मक सकळही नाशक। निश्चय हा विवरी।।१।।*
*शांतिदयापर श्रवणी सादर। भव भ्रम न उरे उरी।।२।।*
*सहज पूर्ण निजरंगी रंगूनी। सद्गुरु पाय धरी।।३।।*

---

**पान नं. २३ वरून**

**मुले** - (जोरात) नाही.

**आजी** - अरे हिरण्यकश्यपू म्हणजेच आपला अहंकार! व प्रल्हाद म्हणजेच आपल्या आतील सात्त्विक वृत्ती जी आपणांस चांगले वागावयास लावीत असते. आता या दोन्हीही परस्परविरोधी! त्यामुळेच हिरण्यकश्यपू म्हणजेच आपला देहाहंकार आपल्या आतील चांगल्या गुणाला म्हणजेच प्रल्हादाला त्रास देत असतो.

**गोट्या** - पण तो त्रास देतो म्हणजे कसा गं आजी?

**आजी** - अरे हे बघ! आपण नं, एकेक शिक्षा नीट समजावून घेऊ! प्रथम तो त्याला विषारी साप असलेल्या काचेच्या पेटीत सोडतो.

**चिंगी** - पण प्रल्हाद मात्र तिथेही 'नारायण नारायण' असे म्हणत जिवंतच रहातो.

**आजी** - अरे, इथे विषारी साप म्हणजेच कुविचार! त्यांच्यामध्ये आपण अडकतो. हे बघ जर आपल्यातला प्रल्हाद जागा असेल म्हणजेच आपल्यातला सत्त्वगुण जागा असेल तर आपण या वाईट विचारांना बळी पडत नाही. असा त्याचा अर्थ होतो.

**मुले** - पण ते कसे काय करायचे?

**आजी** - अरे, आपल्यातील चांगुलपणा आपण सतत जागरूक ठेवला पाहिजे. मग काय बिशाद आहे ह्या कुविचारी सापांची?

**मुले** - खरेच आजी! पण पुढच्या शिक्षेचे काय?

**आजी** - मुलांनो, आज तुम्हाला एवढेच सांगणार आहे. जेवायला उशिर झाला नं! आपण गोष्टीचा पुढचा भाग उद्या बघू!

(क्रमशः)

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर, डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २, गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

To,

BOOK-POST

## संस्थेतील
## प्रमुख सप्ताह व उत्सव

**श्री स.स. दत्तात्रय महाराज जयंती उत्सव**
पौष कृ.१ दि. २ जाने ते ११ जाने. २०१२

**महाशिवरात्र उत्सव**
माघ कृ १३ दि. १८ फेब्रु. ते २० फेब्रु २०१२

**श्री स.स. भागिरथीनाथ पुण्यतिथी उत्सव**
रंगपंचमी फाल्गुन वद्य ५
दि. ४ मार्च ते १२ मार्च २०१२

**नृसिंह जयंती उत्सव**
वैशाख शु. १४ दि. ३० एप्रिल ते ६ मे २०१२

**गुरुपौर्णिमा उत्सव**
आषाढ शु. १५ दि. २५ जून ते ४ जुलै २०१२

**श्री स.स. माधुरीनाथ वाढदिवस उत्सव**
श्रावण शु. १३ परम १४
दि. २५ जुलै ते ३१ जुलै २०१२

**श्री स.स. दत्तात्रय महाराज पुण्यतिथी उत्सव**
कार्तिक कृ. १
दि. २१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०१२

## मंदिरात केले जाणारे अन्य उपक्रम

| | |
|---|---|
| **श्री स.स. बलभीममहाराज जयंती** | - गुढीपाडवा - चैत्र शु. १ |
| **श्री स.स. लक्ष्मणमहाराज जयंती** | - वसंतपंचमी - चैत्र शु. ५ |
| **श्रीरामनवमी** | - चैत्र शु. ९ |
| **श्री स.स. नारायण महाराज जयंती व पुण्यतिथी** | - आषाढ कृ. ५ |
| **श्री स.स. भागिरथीनाथ जयंती** | - आषाढ व १५ दीप अमावस्या |
| **श्रीकृष्णजयंती** | - श्रावण कृ १ ते ८ |
| **श्री स.स निरंजनस्वामी पुण्यस्थिती** | - परिवर्तीनी एकादशी- भाद्रपद शु. ८ |
| **श्री. स.स. बलभीममहाराज पुण्यतिथी** | - इंदिरा एकादशी - भाद्रपद व. ११ |
| **नवरात्र** | - अश्विन शु. १ ते ११ |
| **श्री स.स. निरंजनस्वामी जयंती** | - कार्तिक शु. ८ |
| **श्रीदत्तजयंती** | - मार्गशीर्ष १५ |
| **दासनवमी** | - माघ व १ ते व. ९ |

**अधिक भाद्रपद १८ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०१२**